आमची संस्कारक्षम माहितीपूर्ण
विज्ञानविषयक पुस्तके



| | | |
|---|---|---|
| * डॉ. हेमा साने | - | आपले हिरवे मित्र |
| * श्रीकृष्ण केसरी | - | भारतीय विज्ञानाचे दीपस्तंभ |
| | - | सुगम विज्ञान कथा |
| | - | विज्ञान पश्चिम दीप |
| | - | सुसंस्कार एक प्रयत्न |
| * डॉ. अश्विनी धोंगडे | - | अल्बर्ट आइनस्टाइन आणि इतर कथा |
| * प्रा. सुमती कुकडे | - | आजारी मुलांचा आजारपणातील आहार |
| | - | सकस खा बलवान व्हा |
| * अंजली तळेगावकर | - | विविधतेतील एकता |
| * शंतनू चिंधडे | - | डॉक्टर माझे डोळे |
| * शांता लेले | - | मण्यांची माळ |
| * सौ. कौमुदी जमखिंडीकर | - | सजीवांचे सहजीवन |



मधुराज पब्लिकेशन्स् प्रा. लि.
२५१ क, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०


# आपले हिरवे मित्र


डॉ. हेमा साने

# आपले हिरवे मित्र

डॉ. हेमा साने

**मधुराज पब्लिकेशन्स् प्रा. लि.**
२५१ क, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०.

आपले हिरवे मित्र
AAPLE HIRVE MITRA

**प्रकाशिका**
सौ. मधुमिता राजीव बर्वे
डायरेक्टर,
मधुराज पब्लिकेशन्स् प्रा. लि.
२५१ क, शनिवार पेठ,
पुणे - ४११ ०३०

© **डॉ. हेमा साने**

**सहावी आवृत्ती** - २५ जुलै २०१३

**प्रकाशन क्रमांक** - ७४७

**ISBN** - 81 - 7492 - 045 - 5

**मुद्रक**
मधुराज प्रिंटर्स ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि.
सर्व्हे नं. २९/८-९,
पारी कंपनीजवळ
धायरी, पुणे ४११०४१

**टाईपसेटिंग**
सौ. मधुमिता राजीव बर्वे
पितृछाया मुद्रणालय
९०९ रविवार पेठ, पुणे - ४११ ००२

**मुखपृष्ठ** - निशा डंके

**मूल्य** - रुपये तीस मात्र

**ज्यांच्या कौतुकाच्या बळावर**
**आयुष्यात काहीतरी करता आलं**
**त्या मातापित्यास**

## अनुक्रम



| | | |
|---|---|---|
| १. | कमलवंदना | ५ |
| २. | पारिजात | ९ |
| ३. | ख्रिसमस ट्री | १३ |
| ४. | केळी, नव्हे रंभा! | १७ |
| ५. | साग गान | २२ |
| ६. | सुरस तुळस | २६ |
| ७. | श्रीपुष्प लवंग | ३१ |
| ८. | रुचकर बोर | ३५ |
| ९. | सु-पारी नसलेली सुपारी | ४० |
| १०. | आपटा, कांचन आणि मंडळी | ४३ |


संपूर्ण संस्कृत साहित्य व्यापून राहिलेले एक पुष्प म्हणजे कमलपुष्प! काव्यात आणि नाटकांतून कमलफुलांची उपमा इतक्या वेळा भेटते, की रस्त्यावरचे अनेक 'स्पीडब्रेकर'. 'करारविंदेन पदारविन्दम्, मुखारविन्दे, विनिवेशयतम्' असे बालमुकुंदाचे वर्णन म्हणजे प्रत्येक अवयव कमलाइतका नाजूक आणि कोमल, देखणा!

कमल या नावाबरोबरच पद्म, अरविंद, अम्भोज, सरोज ही नावेही शोभायमान झाली आहे. वनस्पतिशास्त्रीयदृष्ट्या कमळाची अनेक गोत्रे आहेत. कमळ म्हणजे नेलम्बो न्युसिफेरा, नीलकमल म्हणजे निम्फय्या स्टीलाटा. याचेच एक नाम राजीव कमळ. निम्फय्या लोटस म्हणजे अरविंद. हे केवळ सकाळीच उमलते. उत्पल हे त्याचे आणखी एक नाम. बिस म्हणजे ब्राझेनिया पेल्टाटा, आणि या सर्वांवर वरताण म्हणजे राजकमल ... व्हिक्टोरिया रेजिया.

या प्रत्येक नावाला इतिहास आहे. नेलम्बो हे कमळाचे सिंहली नाम, निम्फय्या हे ग्रीक नाम. निम्फ -अर्थात जलपरी. व्हिक्टोरिया रेजिया ही जाती अमेझॉन नदीच्या मेमोरे या उपनदीत. एका जर्मन वनस्पतिशास्त्रज्ञाला प्रथम मिळाली. ही जाती नंतर युरोप

गेले. अर्थात हे शाही पुष्प म्हणजे रेजिया झाले, आणि म्हणूनच 'राजकमल'. भारतात सिबपूर या कलकत्त्याजवळ उद्यानात राजकमल रमले आहे. अगदी वाच्यार्थानेही ते 'राज' आहे. जलाशयावर तरंगणाऱ्या, एखाद्या थाळीच्या आकाराचे त्याचे पान जवळजवळ एक मीटर किंवा त्याहून अधिक व्यासाचे असते. 'थाळीसारखे' अशासाठी म्हटले की त्याच्या कडा उभ्या असतात. एक तान्हुले त्याच्यावर आरामात पहुडेल. बालमुकुंद जर पानावरच तरंगला असेल, तर ते पान खचितच 'राजकमळा'चे असेल. अर्थात फूलही या रुबाबाला साजेसेच असते.



'पद्म' म्हणा अथवा 'अरविंद' - कमल हे 'अम्भोज' आहे. कोणत्याही जातीचे कंद कमळाचे चिखलात वाढतात. त्यापासून फुटलेली पाने पाण्याच्या पृष्ठभागाकडे झेपावतात. निम्फच्या लोटसची पाने गोलाकार असतात;



पण कोवळी पाने मात्र काहीशी भाल्यासारखी असतात. नेलम्बोची पाने वर्तुळाकार आणि नेहमीच पाण्यावर तरंगत न वाढता खूप वर डोकावतात. पान ज्या वेळी पाण्याच्या पृष्ठभागावर चिकटून वाढते त्या वेळी त्याच्या वरच्या पृष्ठभागावर मेणासारखा पदार्थाचा पातळ थर असतो. त्यामुळे पाण्यामुळे ते ओले तर होत नाहीच; पण पाणी आपल्या वाहण्याचा गुणधर्म विसरून थेंबाकार बनते. 'ते भासे नलिनी दलावरि पाहा सन्मौक्तिकाचे परी' अशी मोत्यासारखी उपमा आहे ती उगीचच नाही.

कमलपुष्प म्हणजे सौंदर्याचा परिपूर्ण आविष्कार. नाजूकपणाचा दाखला देताना कमलनालाचा म्हणजे फुलाच्या देठाचा हवाला देतात. एकूणच जलवानस असल्याने कमळ नाजूक त्याच्या पानाचा अथवा फुलाचा देठ स्पंजासारखा फुगीर असतो. त्यात काष्ठ ऊती अजिबात नसते.

कमलपुष्पाच्या वेगवेगळ्या प्रकारांतील निदलांची आणि दलांची संख्या वेगवेगळी असते. पुष्पस्थळीवरील दलपुंजांची, पुंकेसरांची आणि स्त्रीकेसरांची रचना वलयाकार म्हणजे 'सुवलय' असते. ती पायरीपायरीचीच म्हणजे सोपानरचना असेल, तर तिला 'कुवलय' अशी संज्ञा आहे. पुंकेसर आणि स्त्रीकेसरही काही जातींत दलांसारखेच दिसतात आणि पुष्पस्थळीही भोवऱ्यासारखी असते. कमळांचे पुंकेसर हाही संस्कृत वाङ्मयातील वर्ण्य विषय आहे. 'बिसतंतू' म्हणजे पुंकेसर हे राजहंसाचे खाद्य. हिमालयाच्या परिसरात १५,००० फूट उंचीवर वाढणाऱ्या 'बिस' या प्रजातीच्या फुलाचे हे पुंकेसर.

'मेघदूता'त कालिदासाने मेघाला सांगितले, कैलासाच्या पथावर तुला राजहंस सोबत करतील. प्रवासातील शिदोरी म्हणून त्यांनी बिसतंतू बरोबर घेतलेले असतात. भारवीला 'छत्र' भारवी म्हणतात. त्याची एक अनुपम कल्पना- 'बिसतंतू' मधून उधळल्या गेलेल्या परागांमुळे आकाशात एक छत्रच निर्माण झाले.

पण एकूण उत्तरेकडे मैदानी प्रदेशात पावसाळ्याच्या अखेरीस सगळीच तळी आणि सरोवरे कमळांनी तुडुंब भरलेली असतात. खरोखरच त्यांच्या सगळ्यांच्या परागांची उधळण छत्र निर्माण करील; पण त्यामानाने दक्षिणेत कमळे थोडी कमीच.

व्यावहारिक जगाने कमळालाही मोकळे सोडले नाही. कमळदेठांची भाजी, पानांची भजी- फार काय पत्रावळीदेखील (हाय गे शकुंतले!) अन् कमळकाकडीचे सांडगे वगैरे. आयुर्वेदात कमळ शीत गुणधर्माचे म्हणून गाजलेले. अथर्ववेदात अग्निदाह निवारणाच्या सूक्तात कमळाचा उल्लेख आहे. भारतीय देवता कमलासना अथवा कमळधारी, मग बहना असो वा लक्ष्मी! पद्मपाणी बुद्धही जगविख्यात.

भारतीय तत्त्वज्ञानाच्या उल्लेखाशिवाय कमळ संपत नाही. जगाच्या व्यवहारात बुडूनही परत्त्वाचा वेधाचे प्रतीक म्हणजे कमळ. योगी 'अरविंदा'ची संकल्पना 'आत्मोन्नतीला साद देण्यासाठी ईश्वरी शक्ती खाली अवतरते, त्याचा साक्षात्कार म्हणजेच 'पंकज'.

* * *



'वैशाली', 'रूपाली', 'दीपाली', 'शेफाली' या ओळीतील पहिली तीन नावे ठीक. पण 'शेफाली' नावाच्या बालिकेस विचारलं, की बाई गं! तुझ्या नावाचा अर्थ काय? तिला कदाचित ठाऊक असेल, की 'शेफाली' हे मूळ 'शेफालिका' या बंगाली नावाचे सटसुटीत रूप आहे; पण मग शेफालिका म्हणजे तरी काय; शेफालिका हे पारिजातकाचे बंगाली नाव आहे.

पारिजात! पाच स्वर्गीय वृक्षांपैकी एक. समृद्धं सौभाग्यं सकल वसुधायाः म्हणून धरतीवर अवतीर्ण झालेला. देवदानवांनी केलेल्या समुद्रमंथनातून जी चौदा रत्ने बाहेर आली, त्यांपैकी एक! म्हणून लक्ष्मीचा भाऊ आणि अमृताचाही. त्यामुळेच अतिवंदनीय!

पारिजातकाचे वानसशास्त्रीय नाव निक्टँथस. आरबोर-टिस्ट्रिस पैकी निक्ट्रँथस या प्रजातिवाचक नामाचा अर्थ होतो रात्री उमलणारे पुष्प, तर आरबोर-टिस्ट्रिस याचा अर्थ अश्रुपात करणारा वृक्ष. अर्थातच हे विशेषण त्याच्या फुले गाळण्याच्या वृत्तीमुळे लाभले असावे. जाई, जुई, चमेली, मोगरा आणि पारिजात या सर्वांचे कूळ एकच आहे. मात्र जाई, जुई, कुंद, चमेली लहान खुरेच असतात. पारिजातचा वृक्ष आहे. बरोबरच आहे एका परीनं. कारण तो स्वर्गीय वृक्ष आहे.

इतरांपेक्षा वेगळाच असणार! पण फुलांची आणि सुगंधाची पखरण हा या संपूर्ण कुलाचा स्थायीभाव! युरोपमधील प्रसिद्ध ऑलिव्ह फळेही याच कुळीची.

पारिजात संपूर्ण भारतभर पसरलेला आहे. हिमालयाच्या पायथ्यापासून कन्याकुमारीपर्यंत आणि भारताबाहेर ब्रह्मदेश किंवा म्यानमारमध्येही तो आढळतो. असे समजले जाते, की सातपुडा पर्वराजीत पारिजाताचे अस्तित्व नैसर्गिक आहे. इतरत्र मात्र तो लागवडीखाली असतो. हिंदीभाषक याला हरसिंगार म्हणून ओळखतात, तर गुजराती जन जयपार्वती म्हणून. दाक्षिणात्यांना मात्र तो पारिजात म्हणूनच माहिती आहे.

साधारणतः सात आठ मीटरपर्यंतची उंची गाठणाऱ्या या वृक्षाचे खोड अतिशय बेढब राखाडी किंवा हिरवट पांढऱ्या रंगाचे असते. त्याला गाठी आल्यासारखेही भासते; पण हा समुद्रमंथनातून जन्मला त्या वेळी म्हणे त्याला सुवर्णकांती होती आणि त्याची पाने पोवळ्यासारखी होती. फळांना गंध होता. म्हणून तर देवेन्द्राने त्याला अमरावतीस नेले.

पारिजाताच्या कोवळ्या फांद्या काहीशा चौकोनी, थोड्याशा लवयुक्त असतात. पानांच्या जोड्यांची रचना स्वस्तिकाकार असते. पर्णपाते अतिशय खरखरीत, इतके की त्याने छान पॉलिश होईल. कडा दंतूर असतात.

श्रावण-भाद्रपद म्हणजे पारिजाताचा ऐन बहराचा काळ! फांद्यांच्या टोकाशी फुलांचे घोष उमलू लागतात. याच्या कुळधर्माप्रमाणेच फुले सायंकाळी उमलतात.

पारिजाताची फुले हा अनेक वाङ्मय प्रकाराचा जिवलग सखा ''बहरला पारिजात दारी, फुले का पडती





शेजारी?'' असे दुःख जसे प्रकट होते तसेच 'अंगणातल्या' पारिजाताची 'फुले नाजूक लाख मोलाची' इतकी नाजूक, की ''माय माऊलीच्या'' काळजाच्या तोलाचीच, असे आवर्जून विनवलेले आहे.

खरोखरच ही फुले नाजूक असतात. दलपुंजाच्या पोवळ्यासारख्या लाल नलिकेच्या टोकाशी पाच पांढरी दले अलग होऊन ताऱ्यासारखी पसरतात. लखनौच्या राष्ट्रीय उद्यानाने आपले 'ब्युटी पार्लर' सारखे कौशल्य पणाला लावून त्याचे 'कर्णफूल', 'चक्र', 'ध्रुव' इत्यादी नवीन वाणही तयार केले आहेत.

पारिजात फुलतो अमाप. लक्षपुष्प भाराने, धरतीला अभिषेक करण्याचे चातुर्मासाचे त्याचे व्रत असावे. रात्री उमललेली फुले सकाळी गळून पडलेली असतात. याविषयी एक पुराणकथा आहे. कुण्या एका 'पारिजाता'

नामक राजकन्येला 'फुलराणी' प्रमाणेच रविकिरणाने मोहिनी घातली. माहेरचे सर्व पाश तोडून ती सूर्यासमवेत निघाली; पण हाय रे दैवा! सूर्याला ती नकोशी झाली. दुःखावेगाने पारिजाताने देहत्याग केला. तिच्या दहन भूमीवर एक वृक्ष उगवला तोच पारिजात. त्याच्या धवलपुष्पांचे लाल देठ म्हणजे पारिजाताचे हृदय. पण आजही जुन्या कटू अनुभवांमुळे सूर्यकिरणांना पाहिल्यावर ही फुले गळून जातात.

पारिजाताचा वृक्ष कमी पाण्यावर खडकाळ जमिनीतही वाढतो. त्याला बकऱ्या तोंड लावत नाहीत. त्याची वाढही जोमाने होते, पण आश्चर्य म्हणजे सामाजिक वनीकरणात मात्र त्याच्या गुणांचा उपयोग करून घेतलेला नाही.

फुलांच्या नलिकेत निक्टॅनथीन नावाचे रंगद्रव्य असते. रेशीम रंगवण्यास ते उपयुक्त आहे. मात्र, हा रंग फारसा टिकाऊ नाही. फुलात ग्लुकोजही असते. मग खाद्यरंग केशराला पर्याय म्हणूनही तो वापरता येईल.

पारिजाताच्या पानांचा काढा हा हिवतापावरचा अत्युत्कृष्ट उपाय आहे. अगदी क्विनाईनइतकाच गुणकारी पण पिकतं तिथं विकत नाही हेच खरं!

नरकचतुर्दशी झाली! पारिजात हा मूळचा स्वर्गीय वृक्ष. केवळ सत्यभामेच्या हट्टापायी तो पृथ्वीतलावर परतला. भगवंतांनी तो लावताना जे कपट नाट्य केले तेही सर्वश्रुतच आहे, असे असले तरी अखेर तो भामेचाच पारिजात आहे!

***



# खिसमस ट्री

आज पंचवीस डिसेंबर. म्हणजे नाताळ! आपली संक्रांत जशी तिळगूळ आणि चौदा जानेवारीबरोबर जोडलेली तसा नाताळ आणि 'खिसमस ट्री'चा संबंध अतूट आहे.

हा वृक्ष तसा आपल्याला परकाच! आज जरी ठायी ठायी एक शोभिवंत, देखणे झाड म्हणून त्याची लागवड केली जात असली तरी तसा हा अनिवासीच. विशेषतः दक्षिणेला याचा फारसा परिचय नाही. उत्तरेकडे देवभूमी हिमालय आणि काश्मीरच्या खोऱ्यातील नयनरम्य वनश्री खिसमस वृक्षाचे निकटवर्ती नातेवाईक. 'चीड', 'सरल', 'देवदारू'यांचे उल्लेख कविकुलगुरूच्या महाकाव्यातून अनेकदा भेटतात. 'कुमारसंभवात' सरल वृक्षावर हत्ती गाल घासतात. त्यामुळे आतली राळ बाहेर पडून तिचा सुगंध सर्वत्र दरवळतो. अथवा 'देवदारू' वृक्षांच्या कोवळ्या पालवीमधून घुसून त्यांच्या चिकाने सुगंधित झालेले दक्षिणेकडे वाहणारे वारे 'मेघदूता'त वाहतात. तर 'रघुवंशा'तील दिलीप राजाला 'अमुं पुरं पश्यसि देवदारुम्' असे मायावी सिंह सांगतो. एकूण उत्तरेकडील पर्वतराजीच्या वनातील खिसमस वृक्षाचे बांधव आपल्याला ज्ञात होते. म्हणजे शीत कटिबंधात ही मंडळी सुखेनैव नांदतात.

'ऑरार्केरिया' हे खिसमस वृक्षाचे वानसशास्त्रीय नाव. आतापर्यंत आपण भारताबाहेर प्रयाण केलेल्या मंडळींच्या कथा पाहिल्या. ऑरार्केरिया मात्र मूळचा चिलीचा; तिकडून इकडे आलेला. दक्षिण चिलीचा! एक प्रांत ऑराको. खिसमस वृक्ष तिथलाच. म्हणून आपल्याकडे जसे 'नगरकर', 'नागपूरकर' आहेत तसा 'ऑरोका'चा रहिवासी म्हणून हा ऑरोकेरिया झाला.

सूचिपर्णी हा या वृक्षाचा बाणा. सामान्यतः ही सर्व मंडळी उंच पवर्तराजीत वास्तव्य करणे पसंत करतात. हा मात्र याला अपवाद. कमी उंचीवर, अगदी समुद्रसपाटीजवळ उष्ण हवामानात राहणे याला भावते. अगदी नुकताच अंदमानाच्या छायाचित्रात अत्यंत डौलदारपणे उभे ठाकलेल्या खिसमस वृक्षाचे दर्शन झाले. आणि याची खात्री पटली. सरळ आभाळाच्या दिशेने झेपावताना अगदी दीडशे फुटाची उंची हा सहज गाठतो. फांद्यांची रचना विशिष्ट पद्धतीची. त्यामुळे रूप एखाद्या रेखीव दीपमाळेसारखे भासते. म्हणून भारतात मंदिरांच्या प्रकारात याला स्थान मिळायला काही प्रत्यवाय नसावा. खिसमस वृक्षाची पाने म्हणजे अणकुचीदार सुयाच! अतिशय चिवट, रेशमासारख्या मऊ आणि तकाकित पानांनी कोवळ्या फांद्या वेढलेल्या असतात. मात्र जुन्या खोडांवर आाणि फांद्यांवर त्यांचा लवलेशही नसतो. अशा वृक्षांवर चढणे अगदी मर्कट मंडळींनाही अवघड जाते. म्हणूनच या वृक्षाचे सर्वसामान्य नाव मंकी पझल.

या वृक्षाला फुले येतात. केवळ वनस्पतिशास्त्राचे विद्यार्थीच त्यांना फुले' म्हणण्याचे धाडस करू शकतील.



ही फुले एकलिंगी असतात. नरपुष्पे म्हणजे पुंकेसरांचा गुच्छ आणि स्त्रीपुष्पे म्हणजे बीजांडे धारण करणारी बीजपत्रे. भारतीय तत्त्वज्ञानातील 'न कर्म फले स्पृहा' या उक्तीप्रमाणे फळाची अपेक्षा नाही. केवळ बीजधारणा एवढीच मनोकामना बाळगून खिसमस वृक्ष वाढतो. या बिया शंक्वाकृती समूहात तयार होतात.

खिसमस वृक्ष शोभिवंत वृक्ष तर आहेच पण उंच्च प्रतीचे लाकूडही त्यापासून मिळते. या लाकडात राळ नावाचे सुगंधी द्रव्य असते. झाडातून बाहेर झिरपल्यावर ते डिंकासारेख घट्ट होते. याला कौरी डिंक संज्ञा आहे. व्हार्निश करण्यासाठी याचा प्रयोग करतात. ही राळ अत्यंत ज्वालाग्राही आहे. त्यामुळे खिसमस वृक्ष म्हणून यावर मेणबत्त्या लावताना काळजी घ्यावी लागते.



या वृक्षालाच ख्रिसमस वृक्ष हा मान का मिळाला यासंबंधी एक कथा नोंदवली आहे. सोळाशे पाचपर्यंत ख्रिस्ती धर्माचा प्रसार जर्मनीत झालेला होता. त्या काळी तिथे बॉनीफेस नावाचे एक धर्मोपदेशक होते. आतापावेतो ख्रिश्चन धर्मात ओक वृक्षाचे प्राबल्य होते. बॉनीफेसनी लोकांना असे सांगितले की ओक वृक्षाऐवजी ऑरार्केरिया हा अधिक योग्य ख्रिसमस वृक्ष आहे. कारण नभांगणातील दयाघनाकडे हा मार्गदर्शन करीत असतो. तेव्हापासून ऑरार्केरिया ख्रिसमस वृक्ष झाला. बॉनीफेस यांनी लोकांना पुढे असाही संदेश दिला की देवबाप्पा कुठेही जंगलात, अंधारात राहत नाही. तो तुमच्या घरात आणि मनात नांदतो. म्हणून २५ डिसेंबरला ख्रिसमस वृक्ष घरात आणा आणि दीपज्योतींनी सजवा. घरदार प्रकाशमय करा. इतकेच नव्हे तर २५ डिसेंबरला जो कोणाता वृक्ष घरी आाणाल तो ख्रिसमस वृक्षच आहे. तो प्रभूच्या मंगलमय आगमनाचा प्रतीक आहे.

शेवटी कुठलाही धर्म असला तरी अज्ञात शक्तीवर त्याचा दृढभाव असतोच. कालचक्र फिरत असते. जी अज्ञात शक्ती कडाक्याची गोठवणारी थंडी आणते, तीच जीवनदायी, उबदार वसंतालाही घेऊन येते. म्हणून या शक्तीवर दृढविश्वास, श्रद्धा हवी. म्हणून वाटते, ''अजून कळ्यांना गंध येतो, अजून तारका चमचमतात. अजून चंद्राच्या किरणांसाठी सागरलाटा हेलावतात. पाठीवरचे वळ सोसताना तुझ्या कृपेचे बळ आहे. देवा! तुवा निर्मिलेले जग बरे चालले आहे!''

***



# केळी, नव्हे रंभा!

वास्तुशोभन हा प्रकार भारतीयांना नवा नाही. दारातील रेखीव रांगोळी, कडेला लावलेले हिरव्यागार रसरशीत केळीचे खांब आणि चौकटीवरील तजेलदार आम्रपर्णांचे तोरण अशी सजावट झाली, की प्रवेशद्वारदेखील आाकर्षक नववधूसारखे प्रसन्नतेने हसते.

यात केळीच्या खांबांचा वाटा मोठा; पण ते नुसतेच शोभेपुरते, दिखाऊ नसतात. केळी ही वनस्पती समृद्धीचे, संपन्नतेचे प्रतीक आहे. तशी ही खास भारतीय. आसामचा डोंगराळ भाग, बंगाल, ब्रह्मदेश, सयाम आणि लांबवरचा टप्पा म्हणजे इंडोनेशिया. हा सर्व आसमंत केळीचे माहेरघर समजला जातो. गोष्ट फार फार जुनी, ज्ञात इतिहासापूर्वीचीच असावी. ज्या वेळी केळीने या सीमा पार करून, अनेक भूभाग काबीज केले त्या वेळची. विलक्षण. चक्रावणारा किस्सा म्हणजे अरबी लिखाणात केळ्याचा उल्लेख आढळतो. केळ्याचे वानसशास्त्रीय नाव मुसा पॅराडिझियाका. यातील मुसा या प्रजातिनामाची व्युत्पत्ती दोन प्रकारे लावतात. मुझ किंवा माऊझ हे अरबी भाषेतील केळ्याचे नाव. दुसऱ्या अंदाजानुसार ऑगस्ट्स् सीझरचा जो डॉक्टर होता, त्याचे नाव होते मुसा. त्याच्या गौरवार्थ केळ्याचे नाव ठेवले मुसा. पॅराडिझियाका हे विशेषण मात्र एकमताने निवडलेले. 'स्वर्गीय वृक्ष' अरबी वाङ्मयातही

केळ्याचा उल्लेख स्वर्गीय वनस्पती असाच आहे. देवाच्या इडन या बागेत जसे सफरचंदाचे झाड होते; तसेच केळ्याचेही झाड होते. सफरचंदाचा वृक्ष म्हणजे ज्ञानवृक्ष, तर केळी म्हणजे स्वर्गीय वृक्ष. आश्चर्याची आणखी एक बाब म्हणजे संस्कृतमध्ये केळीची जी अनेक नावे आहेत, त्यातील एक नाव 'रंभा'. अनेक पंथभेदांत एकवाक्यता आणणारी केळी ही एकच वनस्पती असावी. केळीची प्रचंड आकाराची पाने अॅडम आणि इव्हची वस्त्रे होती. केळ्याचे दुसरे नाव आहे मुसा सॅपिएंटम्- यातील सॅपिएंटमचा अर्थ आहे शहाणा, विद्वान किंवा ऋषी. भारतीय वाङ्मयात अशी एक धारणा आहे, की शहाणी माणसे केळीच्या सावलीत बसतात आणि आपले ज्ञान अधिक वाढावे म्हणून केळी खातात. संस्कृतातील केळ्याचे दुसरे नाव 'मोच' असे आहे. याचा अर्थच मुळी या जगातील इच्छा, आकांक्षांपासून मुक्ती. तसेच 'कदली' या आणखी एक नावाने केळी ओळखली जाते. कदली म्हणजे ध्वज, पताका.


काही का असेना, तात्पर्य एवढचे की 'केळी', ऊर्फ 'कदली'ला लांबलचक इतिहास आहे. अलेक्झॅडरने भारतावर आक्रमण केले, तेव्हा सिंधूच्या खोऱ्यात केळीच्या बागा होत्या. तत्पूर्वीही म्हणजे महाभारतात कुबेर पुष्करिणी नावाच्या नदीच्या काठावरील कदली बनाचा उल्लेख आहे. बौद्ध भिक्षूंच्या आचारसंहितेत केळीपासून तयार केलेल मोचपान नावाचे पेय आहे. बौद्धकालीन शिल्पात आणि अजिंठ्याच्या चित्रकारीत केळी आढळते.

सामान्यतः असे मानले जाते, की अरबांनी केळीचा



प्रसार पश्चिमेकडे केला. आफ्रिकेतून ती अमेरिकेला पोचली. आजमितीला परिस्थिती अशी आहे, की केळ्याच्या उत्पादनातील जवळजवळ ५५ टक्के वाटा अमेरिकेचा आहे.

केळी ही एक बहुवर्षायु वनस्पती आहे. उष्ण, दमट हवामानात हिची निपज चांगली होते. गाळाची रेताड जमीन विशेषतः भरपूर जैविक पदार्थ असलेली, तिला मानवते. अशा जमिनीतून बाहेर पडलेले कोंब पाहिले, की 'जैसी कोंबाची लवलवा सांगे मातीचे मार्दव' या ओवीची सत्यता पटते. केळीला पाणी भरपूर हवे; पण त्याचा चांगला निचरा व्हायला हवा. केळीचे खोड म्हणजे खोटे खोटे खोड.



नुसता पानांच्या तळाच्च्या गंडळ्यांचा डोलारा; पण मऊ मुलायम आणि गौरवर्णी युवतीच्या पाटेरीसारखा. म्हणूनच कालिदासाने यक्षपत्नीचे वर्णन करताना 'यास्यसत्यूरूः सरसकदली स्तंभ गौरवश्चलत्वम्' असे उद्गार काढले आहेत.

पाने आकाराने प्रचंड असली, तरी फारच हळवी असतात. वाऱ्याच्या झोतापुढे त्यांचा अजिबात टिकाव लागत नाही. लांब रुंद पाते, गडद हिरवा रंग आणि त्यावर धावणाऱ्या असंख्य शिरा, यामुळे ही पाने अतिशय दिमाखदार दिसतात. आपण मात्र फारच अरसिक. चक्क जेवायला केळीच पान घेतो. अर्थात या भोजनाला आनंदही औरच असतो.

केळी फुलते. केळफुलाला 'कोका' असेही म्हणतात. अंगात कुठेही लाल छटा नसताना केळफुलातील पाने मात्र किरमिजीलाल रंगाची असतात आणि प्रत्येक लालपानात केळ्याची फणी दडलेली असते. इतर फुलांत फलनक्रिया झाल्याशिवाय फळ धरत नाही. मात्र केळी याला अपवाद! त्यामुळे फळात बी नसते. म्हणून म्हणतात 'जन्मामध्ये जन्म केळीबाईचा चांगला!'

केळ्याचे उपयोग अनेक आहेत. इंग्लंडचे एक पंतप्रधान डिझरेली म्हणतात, ''केळी ही जगाला प्राप्त झालेली एक अत्युत्कृष्ट, चविष्ट देणगी आहे.'' ते अनेकांचे दोन वेळचे जवेण आहे. केळ्याची भाजी, काप, केळ्याचे पीठ अशी यादीची सुरुवात. सुकेळी हा आणखी एक प्रकार. मधुर केळे म्हणजे बालकाचा पहिला घन आहार.

मॅनिला हेल्प मुसा टेक्सटायलिस नावाची



केळ्यासारखीच एक जात आहे. तिच्या सोपटातील धाग्यांचे कापड विणतात. हे कापड रेशमी कापडाइतकेच तलम असते. आयुर्वेदानुसार केळे सारक आहे, तसेच स्तंभकही.

कविवर्य वसंत बापट यांच्या कवितेत 'मोत्यांची जाळी' भाळी लेवून प्रफुल्ल झालेल्या चवेणीचे वर्णन आहे. ही चवेणी म्हणजे बनकेळ. पावसाळ्यात संपूर्ण घाटा चवेणी जागोजाग आढळते. तिला जी फळे येतात, त्या मात्र वाटाण्याइतके मोठे काळे बी असते.

❋❋❋

# साग गान !

जुलै, ऑगस्टमध्ये सह्याद्रीच्या खोऱ्यातून भटकण्याची मजा काही औरच असते. आभाळ काळ्याशार ढगांनी व्यापलेलं असतं, पायतळीचा हिरवा गालिचा मखमली रुजाम्यावर चालण्याचा सुखद अनुभव देत असतो. अशा वेळी या पार्श्वभूमीवर सागाचा एखादा प्रचंड डेरेदार देखणा तरुवर दृष्टीस पडावा, पण त्याला पाहिल्यावर त्याच्या किंचित पिवळट पांढऱ्या प्रचंड फुलोऱ्यामुळं तो काहीसा धीरगंभीर ऋषीसारखा भासतो. सागाच्या पानांना आवाज नाही. असं वाटतं, की मंद स्वरात पर्जन्यसुक्त म्हणत तो मेघांना आवाहनच करीत असावा.

साग किंवा सागवान हा पश्चिम महाराष्ट्रापासून विदर्भापर्यंत पसरलेल्या पानगळी प्रकारच्या जंगलांचा अनभिषिक्त सम्राट आहे. खुद्द शिवछत्रपतींच्या आज्ञापत्रात सागाचा उल्लेख आहे. ही झाली अगदी गेल्या तीनशे वर्षांतली घटना, पण अत्यंत टिकाऊ लाकूड म्हणून साग अतिशय ख्यातनाम आहे. सागाचं इंग्रजी नामाभिधान टिकणारा तो 'टीक'. टिकणारा तो 'टीक' अशी त्याची व्याख्या करायला हरकत नसावी. सागाचं लाकूड किती टिकाऊ याचा अंदाज आहे. कार्ल्याच्या लेण्याला आतल्या बाजूनं सागाच्या फासळ्या आहेत. ही लेणी इ. स. च्या



पहिल्या शतकातली असं मानलं, तर निदान अठरा-एकोणीसशे वर्षे तरी हे लाकूड टिकून आहे, असं म्हणता येईल. त्या फासळ्यांपैकी फक्त पहिली फासळी लॉर्ड कर्झननं या लेण्याला भेट दिली त्या वेळी बदलली, अशी नोंद आहे.

टीक या नावची व्युत्पत्ती टेक्का या मल्याळी नावात आहे. टेक्का हे नाव पोर्तुगिजांनी उचललं आणि त्याचं टेका झालं. टेक्काचा असा टीक झाला. मूळ टेक्काचा अर्थ सुतार. कदाचित सुतार मंडळींना हे लाकूड फार प्यारं असावं म्हणून असं नाव पडलं असावं. सागाचं संस्कृत नाव आहे शाक किंवा शक. त्याचा अर्थ शाक भाजी असाही होईल, पण शाक म्हणजे सामर्थ्य, शक्ती यांचाही प्रतीक.

हिंदू परंपरेनुसार नवखंड वसुंधरा क्षीरसागरात वसली आहे. या खंडातील एक द्वीप म्हणजे शकद्वीप किंवा भारत. कारण या भागात सागाची निपज भरपूर होती.

पश्चिम घाटातील कालिंदी आणि गंगावली या उत्तर कॅनरा जिल्ह्यांतील नद्यांच्या मुलखापासून उत्तरेकडं म्हणजे गुजरातमधील मही नदीपर्यंत साग अमाप आढळतो. मध्ये प्रदेश आणि आंध्र प्रदेशही सागासाठी योग्य. महाराष्ट्रात चंद्रपूरच्या बल्लारशाह विभागात मुलकुलगट्टा वनविभाग आहे. तिथं राम लक्ष्मण नावाची सागाची एक जोडी होती. त्यांचा जन्म १६८० च्या आसपास असावा. ही जन्म तारीख कशी कळली? १९५८ मध्ये या बंधूंपैकी रामानं 'राम' म्हटलं. त्यांची उंची ४१ मीटर होती अणि बुंध्याचा घेर चार मीटर होता. खोडावरचा वर्धनवलयांवरून वृक्षाच्या वयाची निश्चिती करता येते. त्यावरून 'राम'च्या वयाचा

अंदाज तीनशे वर्षे असा करण्यात आला. मागं शिल्लक राहिलेल्या 'लक्ष्मणा'चं महत्त्व आता वाढलं आहे. त्याच्या भोवतालचं वन हे खास राखीव जंगल आहे. इतकचं नव्हे तर या दीर्घयुष्याचं रहस्य काय याचाही शोध सुरू आहे. त्याच्या शेंड्यांपासून ऊतीवर्धन पद्धतीनं त्याची प्रजा वाढवण्याचेही प्रयत्न चालू आहेत.

पोयट्याच्या वाळूमिश्रित पण पाण्याचा चांगला निचरा होणाऱ्या जमिनीत साग चांगला वाढतो. मोठाली, फताडी अतिशय खरखरीत पानं हे त्याचं वैशिष्ट्य. पानं इतकी मोठी, की जंगलात डबा खायला पानं पसरावीत असा मोह व्हावा, पण सागाच्या पानावर जेवत नाहीत. त्यावर भात ठेवला तर तो लालसर, उतारा दिल्यासारखा दिसतो. अगदी कोवळी पानं चुरगळली की बोटे लालसर होतात. साग पानगळी जातीचा वृक्ष आहे. हिवाळ्यात सगळी पानं गळून पडली की सागाचं रूप विरागी भासतं. नवीन पानांपाठोपाठ पावसाळ्याच्या प्रारंभी सागाला फुलं येतात. ती अतिशय बारीक असली, तर त्यांचे घोस मात्र उठून दिसतात. फळाभावेती निदलपुंजाचं आवरण असते.

सागाचं ताजं लाकूड सोनेरी पिवळ्या वर्णाचं असतं. मात्र कालानुसार ते काळपट पडत जातं. त्याला एक प्रकारचा तेलकटपणा आणि भरीला काहीसा चामड्यासारखा वास येतो. पृष्टभागावर वर्धनवलयं अगदी स्पष्ट दिसतात. लाकूड कठीण असलं तर काम करायला सोपं असतं ते चांगली झिलई घेतं. लाकडाला मागणी असण्याचं मुख्य कारण म्हणजे ते वळवी अणि किडीला जुमानत नाही. आजचा भाव अंदाजे ६०० रु.



घनफूट आहे. त्यातही ब्रह्मदेशाचं 'बर्मा टीक' अधिक प्रसिद्ध.

आयुर्वेदीय उपचारात सागही आहेच. त्याची सालं पित्तशामक, कृमिनाशक आहे. गर्भस्थापक औषधात लाकडाचा वापर आहे. फूल आणि बियांपासूनचं तेल केशवर्धक आहे. त्वचारोगात उपयुक्त आहे. फुलाचा अर्क मूत्रल आहे.


आजकाल सागाला बरे दिवस आले आहेत. बिचाऱ्याला कल्पनाही नव्हती की आपण कधी काळी 'स्वर्णवृक्ष' गणले जाऊ आणि दररोज पेपरात झळकू! बाकी निसर्गात कोणीही कुठल्याही अपेक्षेनं वाढत नाही, फुलत नाही, फळत नाही. प्रत्येक जण निसर्ग चक्राचाच एक भाग असतो. म्हणूनच सागही पानं गाळणार, त्याला पुन्हा पालवी फुटणार आहे, तो फुलणार आहे पुनः पुन्हा!

***

# सुरस तुळस

आपण सध्या 'ब्लॉक', 'अपार्टमेंट' संस्कृतीत नांदत असतो. माणसे स्वतःला चार भिंतींत ब्लॉक करून घेतात. अपार्टमेंटमध्ये राहतात म्हणजे त्यांचे संबंध दुरावलेले असतात. असे असेल तर, तुळशी वृंदावन हे जुन्या संस्कृतीचे प्रतीक तिथे कसे दिसणार? असतील, तर थोडे कॅक्टस असतील आणि सक्युलंटस असतील!

दारातील सतेज, डवरलेली तुळस हा गेल्या पिढीतील घरांचा एक अविभाज्य घटक होता. 'तुळशी वृंदावन'





अशी एक वेगळी वास्तू आकारलेली असे. तुळस, तुळशी या नावांबरोबरच या वनस्पतीचे आणखी एक नाव वृंदा. हे समजले की 'तुळशी वृंदावन' असे म्हणताना आपण 'पिवळा पीतांबर' असाच एक विचित्र वाक्प्रयोग करीत असतो.

तुळस आणि तिच्या कुळातील भाईबंदांची मुळे भारतीय संस्कृतीत खोलवर रुजलेली आहेत. त्यापैकी तुळस हिमालयात अठराशे मीटर उंचीपासून संपूर्ण भारत भूमीवर पसरली आहे. प्राचीन वाङ्मयात चरकसंहिता आणि पाणिनीच्या अष्टाध्यायीन तुळशीचा उल्लेख आहे. हा उल्लेख आहे 'सुरस' या नावाने. ऑसिमम सँक्टम असे वनस्पतीशास्त्रीय नाव धारण करणाऱ्या या छोटेखानी वनस्पतीला घरा-घरातून मानाचे स्थान आहे. हिचे दोन वाण आहेत. हिरवी किंवा श्री तुळस आणि दुसरी किरमिजी अथवा कृष्णतुळस. याखेरीज 'रानतुळस' नावाची दुसरी एक जातही असते; पण अपभ्रंशाने आपण तिला 'रामतुळस' केली. जसं आपण 'रानफळाचं' चं 'रामफळ' आणि 'शीतफळा'चं केलंय 'सीताफळ'! याखेरीज 'कर्पूर तुळस' नावाची आणखीही एक जाती आहे ती अंगापिंडाने बरीच थोराड असते. या अगोदरच्या तुळशीची ज्येष्ठ भगिनी. हिला कापराइतकाच गंध येतो आणि याच कारणासाठी केरळ आणि कर्नाटक या राज्यांत तिची मुद्दाम लागवड करतात. तुळशीच्याच गोत्रातीलच आणखी एक वनस्पती म्हणजे सब्जा. त्याचे वानसशास्त्रीय नाव आहे ऑसिमम बॅसिलिकम तुळस आणि सब्जा दोन्हींचे गोत्र एक! म्हणजे ही दोन्ही अगदी जवळचे नातेवाईक पण माणसाच्या धर्म नावाच्या लेबलमुळे याची

फारकत केली. 'नाते वाईट' केले आहे. अन्यथा या दोन्ही वनस्पतीचे गुणधर्म एकच आहेत.

तुळशीचा माडा जास्तीत जास्त एक मीटरपर्यंत उंचावतो. करंगळीएवढे जाड खोड पूर्ण वाढल्यावर पांढुरके असते आणि काष्ठ म्हणण्याइतके कठीण असते. याचेच मणी करून माळा बनवतात. माळ आहे याचाच अर्थ तुळशीच्या मण्यांची माळ घालून वैष्णव अथवा भागवत धर्माचा मार्ग अनुसरणे.

तुळशीच्या पानांची रचना संमुख असते. दातेरी कडा असणाऱ्या पानांवर तैलग्रंथी असतात. त्या नुसत्या डोळ्यांनाही जाणवतात. एका अप्रतिम गंधाचे वरदान तुळशीला या ग्रंथींमुळे लाभले आहे. ऑसिमम या नावाचा अर्थच मुळी गंध दरवळणे. या वासाने एकदम प्रफुल्ल वाटते. जुन्या जमान्यात तुळशीला पाणी घालणे हा प्रघात होता. विशेषतः चुलीच्या धुरातून सुटका होऊन स्वच्छ मोकळ्या हवेत श्वास घेता यावा या साध्या उपचाराला दिलेले ते धार्मिक स्वरूप असावे.

फांद्यांच्या टोकाशी तुळशीचे फुलोरे शेतात. मंजिरी म्हणजे हे फुलोरे; पण मंजिरीचे नाते केवळ तुळशीशीस आहे. एका मंडलात सहा नाजूक फुलांची रचना अशा कलात्मक रीतीने केलेली असते, की प्रत्येक मंजिरी म्हणजे एक बारीकशी दीपमाळाच वाटावी ! फुलेपांढुरकी किंवा फिकट किरमिजी रंगाची असतात. अगदी लहानग्या आकाराची, पण याही फुलांना व दुखावता त्यातील मकरंद सेवन करणाऱ्या मधमाशा असतात. आश्चर्य म्हणजे यांना डंख मारणाऱ्या नांग्या नसतात. बहुधा तुळशीचा, भागवत



पंथाचा क्षमाशीलतेचा गुण माशांनीही संगतीने उचललेली असावा.

पिकलेल्या मंजिऱ्यात बियांसारखी वाटणारी राजगिऱ्याच्या आकाराची चार फळे असतात. बाजारात 'तुळशीचे बी' म्हणून जे बी विकत मिळते, ते मात्र रान तुळशीचे बी असते.

घरगुती उपचारात तुळशीला अनन्य स्थान आहे. तिची पाने कफनाशक आहेत. वाळलेली पाने भुकटी करून तपकिरीसारखी ओढल्यास जुनाट पडसे हरते. दुखणाऱ्या कानात तुळशीचा रस टाकतात. खोकल्यावर तुळशीचा रस आणि मध हा रामबाण उपाय आहे या सर्व उपचारात महत्त्वाचे आहे, ते पानातील पिवळ्या रंगाचे उडनशील तेल. त्यामुळेच तुळशीची पाने उष्ण गुणधर्माची आहेत. या उलट तुळशीचे बी मात्र शीतकर आहे. म्हणून तर तोंड येणे या विकारात त्यांची खीर गुणकारी आहे. तुळशीच्या पाना-बियांबरोबरच तुळशीची मातीही तिचे गुणधर्म घेऊन बसते, म्हणजे औषधी आहे. कीटकदंशावर तिचा लेप उपयुक्त आहे.

घरात तुळस असणे हे कीटक निवारणाचे एक साधन म्हणूनही आवश्यक आहे. तुळशीबन डासांनाही प्रतिबंध करते.

धर्मग्रंथांमध्ये तुळशी ठायी ठायी भेटते. स्कंदपुराणानुसार अमृतकलशातून उडलेल्या थेंबापासून तुळशीची उत्पत्ती झाली. तिला दुसऱ्या कोणाचीही तोड नाही. ती अतुलनीय म्हणून तुल सी, असे ब्रह्मवैवर्त पुराण सांगते. तुलसीदलाखेरीज विष्णुपूजन नाही, पंढरीच्या

विठूरायाला तुलसीपत्रांची तजेलदार माला वैजयंतीमालेसमान ही कृष्णसखी तर आहेच पण केरळी नायरांच्या मते तुलसी शिवप्रिया आहे, ओरिसा व्रतानुसार ती सर्वच देवांचे प्रतिनिधित्व करते म्हणून यमदूतही तिला घाबरतात.

भारतीय तत्त्वज्ञान मुक्तीचा, कैवल्याचा ध्यास घेते. तुलसीपत्र ठेवणे म्हणजे सर्वस्वाचा त्याग. म्हणूनच म्हटले आहे –

''मन ही तुळशी । अर्पूनी हृषीकेशी ।।
पुनरपि जन्मासी । येणे नाही ।।''

❊❊❊



# श्रीपुष्प लवंग

श्री ! बाराखडीचे आद्याक्षर. व्यावहारिक जगात श्री म्हणजे लक्ष्मी आणि म्हणूनही 'श्री' चा मान मोठा. त्यामुळे जसे श्रीफळ, श्रीतुळस आहे तसेच 'श्रीपुष्प' ही ! 'श्रीपुष्प' या देववाणीतील नामाभिधानाचा सरळ अर्थ लवंग.

लवंग, मसाल्याच्या पदार्थांच्या नामावळीतील एक संस्मरणीय वनस्पती. 'युजेनिया कॅरिओफायलाटा' असे तिचे वानसशास्त्रीय नाव. साव्हॉय या फ्रेंच परगण्याचा युजेन नावाचा सरदार वनस्पती-प्रेमी होता. त्याच्या गौरवार्थ हे शास्त्रीय नाव; पटापट नावे बदलण्याची (अर्थातच सकारण) सवय पडलेल्या वनस्पती शास्त्रज्ञांनुसार लवंगेचे आताचे नाम आहे 'सायझिजियम् ॲरोमॅटिकम.' पैकी सायझिजियमचा अर्थ होतो जोडी किंवा दुक्कल. या वनस्पतीची पाने आणि फांद्या यांची रचना जोडीजोडीची असते, त्यावरून हे नाव तिला मिळालेले आहे. ॲरोमॅटिकम या विशेषणाचा अर्थ सुगंध.

जांभूळ, उन्हाळ्याच्या दिवसांत मिळणारे जाम नावाचे पांढुरके, कापूसलेले फळ, लवंग आणि पेरू ही सर्व मंडळी एकाच कुळीची. पैकी पेरू सोडून इतर सगळे 'युजेनिया'. म्हणजे सख्ख्यातले नातेवाईक.

लवंग आपल्या देशाची मूळ रहिवासी नव्हे. मसाल्याची बेटे हा विषुववृत्तीय बेटसमूह ही तिची

जन्मभूमी. प्राचीन वाङ्मयात्त तसे उल्लेख आहे. कविकुलगुरू 'रघुवंशात' म्हणतात की वारे द्वीपांतराहून लवंगा भरून आणणाऱ्या नौका चालवतात. 'गीत गोविंद'कार जयदेव 'ललित लवङ्ग - लता परिशीलन कोमल मलय समीरे' असे वर्णन करतो. पण त्याही पूर्वी 'चरका' ने श्वास सुगंधित करण्यासाठी लवंगेचा वापर सुचवलेला आहे. म्हणजे लवंगेचा उपयोग अतिप्राचीन आहे. मोल्लुका बेटे म्हणजे मसाल्याची बेटे ही जवळजवळ १६०५ पर्यंत पोर्तुगीज लोकांची मिरासदारी होती. नंतर ती डचांची मक्तेदारी झाली. लवंगांच्या व्यापारावर त्या काळात सक्त नियंत्रण होते. १७७० च्या सुमारास मॉरिशस बेटाच्या फ्रेंच गव्हर्नरने डचांच्या हातावर तुरी देऊन जायफळ आणि लवंगांच्या रोपांचे यशस्वी अपहरण केले. त्याची मॉरिशसमधील लागवड यशस्वी झाल्यावर मग उष्ण प्रदेशातील इतर भागांत त्याचा प्रसार झाला. हा प्रदेश त्यांना इतका मानवला की आज झांजिबार म्हणजे लवंगांचे बेट समजले जाते.

लवंगेच्या छोटेखानी वृक्षाला समुद्रकाठची हवा चांगली वाटते. या संदर्भात एक इंग्रजी म्हण आहे. 'द ट्री मस्ट बी एबल टू सी द सी.' थोडक्यात खारी, दमट हवा आवश्यक. त्याचबरोबर रेताड, थोडीशी पोयट्याकडे झुकणारी आम्लधर्मी माती, पाणीपुरवठा भरपूर हवा पण जमीन पाण्याचा निचरा होणारी असावी लागते. लवंगेची लागवड बियांपासून करावी लागते. छाट कलमापासून झाड येत नाही. लवंगेचा वृक्ष सदाहरित वर्गातला. त्याची साल खडबडीत, राखाडी रंगाची असते. पानांची रचना



संमुख असून ती लांबट आकाराची, दोन्हीकडे निमुळती होणारी काळपट हिरव्या रंगाची असतात. पानांच्या कडांना समांतर अशी एक शीर प्रत्येक कडेला असते. पात्यावर तैलग्रंथी असतात. या तेलाचा वास खास लवंगेचाच असतो.

लागवडीनंतर साधारणतः ८-९ वर्षांनी लवंग फुलते. २०व्या वर्षांपासून भरपूर पीक येते. लवंग 'फुलते' असे म्हणणे थोडे चमत्कारिकच ! कारण लागवडीखाली ही फुले उमलू दिली जात नाहीत. त्यांच्या कळ्याच खुडतात आणि या वाळलेल्या कळ्या म्हणजेच बाजारात येणाऱ्या लवंगा. फुलांचे तीन-तीनच्या गटाचे गुच्छ फांद्यांच्या टोकाशी येतात. ही फुले किरमिजी रंगाची असतात. लवंगेचा देठासारखा वाटणारा भाग म्हणजे अंडाशय असून अंडाशयात सामान्यतः बरीच बीजांडे असतात. वरची चार शिंगे म्हणजे चार निदले, त्यात मध्यावर कधीकधी चुरगळलेल्या पाकळ्या आणि अनेक पुंकेसरही सापडतात. देठ म्हणजे अंडाशय. काहीसा टपोरा, फुगीर, खडबडीत आणि लालसर काळपट रंगाचा असतो.

उमलण्यापूर्वीच खुडलेल्या कळ्या उन्हात वाळवतात किंवा भट्टीवर सुकवतात. मात्र काही कळ्यांची वाढ पूर्ण होऊ दिली जाते. त्यांची फळे तयार होतात. लवंगेच्या लागवडीसाठी फळे आवश्यक असतात. लाल रंगाच्या प्रत्येक फळात साधारणतः एकच बी असते. ऑगस्ट ते ऑक्टोबर या काळात फळे तयार होतात. मात्र त्याच्या बिया फार काळ जगत नाहीत म्हणून त्यांची लागवड ताबडतोब केली जाते.

भारत आणि चीन या दोन्ही देशांत लवंगेचा वापर जवळजवळ दोन हजार वर्षे ज्ञात आहे. मात्र केरळ आणि तमिळनाडू या राज्याखेरीज इतरत्र लवंगेची लागवड नाही. म्हणून आयात करणाऱ्या देशांच्या यादीत आपला नंबर पहिलाच असेल.

मसाल्याच्या पदार्थांपैकी एक म्हणून आपला आणि लवंगेचा परिचय. ती भलतीच तिखट म्हणून अतितिखट मिरचीदेखील 'लवंगी मिरची' झाली. तिखट आहे तशीच लवंग उष्णही आहे. वेलदोडा मात्र या उलट ! अति थंड आणि म्हणूनच शीतल. नाजूक प्रकृतीच्या लोकांच्या वर्णनासाठी 'लवंग खाऊन उष्ण आणि वेलदोड्यांनी सर्दी' असे म्हटले जाते. लवंग तेल दातदुखी आणि इतर दंतविकारांवरचा अतिशय गुणकारी उपाय आहे. कृत्रिम व्हॅनिला तयार करण्यासाठी हे तेल वापरतात. या तेलाचे घटक आहेत युजेनॉल आणि कॅरिओफायलिन. साबण, सुवासिक फवारे तयार करण्यासाठीही तेल वापरतात. (जावामध्ये लवंगेची बिडी ओढतात.)

पूजाविधानाच्या जंत्रीत लवंगेचा उल्लेख आहे. शिवपूजन आणि सरस्वती पूजनासही ती हवी. म्हणूनच तिचे नाव आहे 'देवपुष्प !'

***



# रुचकर बोर

वर्षातील प्रत्येक महिन्याला जसे सणवार आणि फुले आहेत तशी फळेही आहेत. जानेवारी महिना संक्रांत आणि तिळाबरोबर बोराशीही निगडित आहे. बोर किंवा बदरी हे तसे प्राचीन फळझाड आहे. बोरी आणि बाभळी यांचा द्वंद्वसमास असला, तरी वानसशास्त्रीय दृष्टिकोनातून त्यांचा अर्थाअर्थी संबंध नाही. फक्त दोघीही शुष्क निर्जल प्रदेशाच्या रहिवासी आणि दोघीही कोटेरी. म्हणूनच वाक्प्रचार तयार झाला, 'ज्या गावच्या बोरी, त्याच गावच्या बाभळी.' बोराचे इतर भाऊबंद म्हणजे त्याचे स्वकुलीय सामान्यांना माहीतही नसतात; पण बोर मात्र वैदिक आणि महाकाव्य कालापासून परिचित आहे. रामायणात शबरीची हृद्य कथा आहे, तर महाभारताचे रचनाकार व्यास बादरायण म्हणूनचही विख्यात आहेत. हिमालयात द्वैपायन भागात बोरीची भरपूर झाडे त्या काळात होती; म्हणून बदरी म्हणजे बोरीशी संबंधित म्हणून तिथे जन्मलेले व्यास 'बादरायण'. हिमालातील एक प्रसिद्ध क्षेत्र बदरीनाथ यांच्या आसपासही बोरीची झाडे खूप होती म्हणूनच त्याला बदरीनाथ असे नाव पडले. बादरायण नावाचा प्रदेश इजिप्तमध्ये होता आणि त्या ठिकाणचे म्हणून व्यासांना बादरायण म्हणत. थोडक्यात बोर हे रुचकर फळांचे झाड म्हणून माहीत आहे. बोराची मोठाली म्हणजे अगदी २५ ते

३० फुटी उंचीची झाडे होतात. किंवा खुरटी झुडपे असतात. चऱ्यामन्या बोरीचा विस्तार वेलीसारखाच होतो. राजस्थान, गुजरातमध्ये गवताळ, चराऊ रानात ही वेल आढळते.

समुद्रसपाटीपासून १५०० मीटर उंचीपर्यंत उष्ण आणि कोरड्या हवामानात बोराचे झाड नैसर्गिकरीत्या आढळते. त्यामुळे भारताचा काही भाग, म्हणजे जास्त पर्जन्यमानाचा, सोडल्यास बोर सर्वत्र आहेच. आर्द्र हवेत बोर वाढत नाही. फळत नाही, मुद्दाम लागवड करताना चांगल्या निचऱ्याची काळी जमीन बोरासाठी निवडतात. ३७°-४८° सें. तापमान आणि भरपूर स्वच्छ सूर्यप्रकाश बोराला चांगलाच मानवतो. पंजाब, राजस्थान, उत्तर गुजरात, विदर्भ या भागात बोर सुरेख वाढते. झाडाच्या खोडाची साल खडबडीत काळी करडी असते. निसर्गतः फांद्यांची रचना अत्यंत वेडीवाकडी असल्याने लागवडीखालील बोराच्या झाडाला वळण देण्यासाठी त्याची भरपूर काटछाट करावी लागते. फांद्यांवर पानांची मांडणी एका पेरावर एक अशी असते. उपपर्णांचे रूपांतर बारक्याशा; पण वाकड्या हुकासारख्या काट्यात झालेले असते. पंजाब आणि बिहारमध्ये बिनकाट्याचा एक वाण आढळतो. पानांचा वरचा पृष्ठभाग पांढुरका हिरवट असतो. काठ दंतुर असतात आणि पात्यावर तीन ठळक शिरा असतात. पानाची मागची म्हणजे खालची बाजू पांढुरकी दिसते. कारण तिच्यावर मऊसर लव असते. फुले पानाच्या बगलेत येतात. त्यांचे अगदी छोटेखानी फुलोरे असतात. आंब्याच्या फुलात आणि बाराच्या फुलात खूपच



साम्य असते. पाच निदले आणि पाच दले यापासून तयार होणारी फुलाची आकृती छोट्याशा चांदणीसारखी असते. बीजांडकोश तळाच्या ग्रंथीत बुडालेला असतो आणि त्याभोवती पाच पुंकेसर असतात. लागवडीनंतर ४-५ वर्षांनंतर बोराला फळे येऊ लागतात. फळधारणेच्या काळात जमिनीत पुरेशी ओल असल्यास फळे गळून पडतात. फुले ऑगस्ट-सप्टेंबर, तर फळे नोव्हेंबरपासून जानेवारीपर्यंत मिळतात. आकार वाणाप्रमाणे बदलतो.

वन्यबोरीला फळभार भरपूर असतो. त्यामुळे आदिम समाजासाठी ते पोटभरीचे अन्न आहे. पौष्टिकतेत बोर सफरचंदापेक्षा श्रेष्ठ आहे. (म्हणूनच की काय, बोराला कीडही फार लागते.) 'क' जीवनसत्त्वाच्या बाबतीत आवळा, पेरू यानंतर बोराचाच क्रम लागतो. त्यात कॅल्शियम, फॉस्फरस आणि लोह हे धातूही अधिक प्रमाणात आढळतात. प्रदेशानुसार बोराचे वाण वेगवेगळे- उमराण, बनारसी, अहमदाबादी इ. गोला नावाची दिल्लीची बोरे.

जळगावजवळची मेहरूणची बोरे, तर पुण्याला बाणेरी बोर. राजस्थान, गुजरातची चऱ्यामन्या बोरे ही चविष्ट असतात. पण खाणं थोडं मचमच फार', असाच काहीसा प्रकार. बोरापासून जॅम, जेली चटणीही करतात. बोरं जशी खाण्यासाठी तसेच बोराच्या झाडाचे इतर भागही उपयुक्त. पाने स्तंभक आहेत, तर साल अतिसार आणि आमांश थांबवते. जंगली फळे पित्तनाशक थंडावा देणारी, वेदनाहारक आहेत. बियांतला मगज निद्राकारक असून, त्याचे तेल कातडी कमावण्यासाठी वापरतात.

लाकूड अति कठीण, मजबूत टिकाऊ म्हणून शेतीची अवजारे करण्यास योग्य आहे. पाला गुरांना विशेषतः दुभत्या जनावरांना घालतात. त्यावर लाखेचे किडेही पोसतात. जमिनीची धूप थांबवण्यासाठी शेताच्या बांधावर बोरी मुद्दाम लावतात. ग्रामीण भागात कोरडवाहू फळ म्हणून ते उत्पन्नाचे मोठे साधन आहे.

अलीकडे कलमपद्धतीने बोराचे अनेक सुधारित वाणही काढलेले आहेत. कडाका, सोनूर २, चौहारा, इलायची ही त्यातील काही नावे.



रामायणातील बोराचा संदर्भ मागे आलाच आहे. पण ती गोष्ट अपुरीच राहिली. शबरीची उष्टी बोरे खायला लक्ष्मण धजेना. एकाअर्थी हा बोरांचाही अपमानच होता. मग पुढे राम-रावण युद्धात लक्ष्मणाला शक्ती लागली आणि त्याला वाचवण्यासाठी हनुमानाने संजीवनी सकट



आख्खा द्रोणागिरीच उचलून आणला. संजीवनी म्हणजे कोणती वनस्पती? तर निरूपणकार सांगतात, ती बोराचीच जात होती. म्हणजे ज्या बोरांचा 'उष्टी' म्हणून लक्ष्मणाने अवमान केला, त्या बोरानेच त्याला जीवदान दिले.

**बोरासंबंधी** प्रचलित एक वाक्प्रचार म्हणजे 'बादरायण संबंध' कोणत्याही घटना अथवा गोष्टींची कारण नसताना घातलेली सांगड म्हणजे बादरायण संबंध. एका पांथस्थाला उतरायला कुठेही जागा मिळेना. अखेर एका श्रीमान गृहस्थाच्या वाड्यात तो शिरला. 'तुम्ही आमचे परिचित किंवा आप्त नाहीत. मग तुम्ही सरळ प्रवेश कसा करता?' अशी पृच्छा यजमानांनी केली. पांथस्थ उत्तरला, 'अहो; अगदी सरळ आहे. तुमच्या आवारात बोराचे झाड आहे आणि माझ्या बैलगाडीचे चाक बोराचे आहे, तेव्हा आपण नातेवाईकच!' असा हा बादरायण संबंध.

***

# सु-पारी नसलेली सुपारी

सुपारी या शब्दाचा भेद सु अधिक पारी असा केला जातो. पारी म्हणजे गर. तसे असेल तर सुपारी म्हणजे चांगला गर असलेले फळ असा होतो. पण सुपारीचा गर मुळात कोरडा ठणठणीत, अशा गराला चांगला गर म्हणजे फारच अडचणीचे आहे.

सुपारीच्या नावाची आणखी एक व्युत्पत्ती मानली जाते, ती अशी मुळात सुपारी आपल्या देशाची रहिवासी नाही. पोर्तुगिजांबरोबर ती भारतात आली. सर्व प्रथम तिची लागवड नालासोपाऱ्याला झाली म्हणून या झाडाचे नाव सुपारी पडले असाव.

याही म्हणण्यात फारसा तथ्य वाटत नाही. कारण सुपारीचं वानसशास्त्रीय नाव आहे अरेका कॅटॅचु. यातील अरेका हे नाव मलबारी नावापासून तयार झाले आहे. म्हणजेच सुपारी मलबारची रहिवासी होती. म्हणजेच ती भारतीय आहे.

सुपारीचे आणखी एक नाव पुगीफळ म्हणजे समूहाने येणारी फळे; पोफळी म्हणजेही सुपारी. नारळी पोफळीच्या बागांची झालर हे पश्चिम किनाऱ्याचे वैशिष्ट्य असते.

नारळ, सुपारी, ताड, शिंदी, खजूर ही सर्वच एकाच कुळातील मंडळी आहेत. त्यामुळे त्यांच्या रूपात भरपूर साम्य आहे.



नारळाप्रमाणेच सुपारीचे खोड सरळ सोट उंच वाढते. त्याला फांद्या फुटत नाहीत. मळकट हिरव्या रंगाच्या खोडाची उंची २० ते ३० मीटरपर्यंत वाढते आणि व्यास होतो जास्तीजास्त ३० सेंमी. खोडावर वर्तुळाकार पांढऱ्या खुणा असतात. त्या गळून पडलेल्या पानांच्या निर्देशक असतात. शिडशिडीत, गडद हिरवी, संयुक्त पाने खोडाच्या अग्रभागी गर्दी करतात. पण नारळापेक्षा एकूण सुपारी अधिक देखणी दिसते.

सुपारीच्या झाडाला नारळासारख्याच मोठा फुलोरा येतो. तो पानाच्या खालच्या बाजूला असल्याने अधिक उठून दिसतो. फुलोऱ्यात अनेक शाखा असतात. त्या प्रत्येक शाखेतील तळाकडची काही फुले स्त्रीपुष्पे असतात. फुले मार्चच्या आसपास येतात तर फळ तयार हाईपर्यंत डिसेंबर उजाडतो. फळ मध्यम आकाराच्या अंड्याएवढी असतात. त्यांचे आवरण लाल शेंदरी रंगांचे आणि तंतुमय असते. आतील बी म्हणजे सुपारी या बीचा बराचसा भाग भ्रुणपोषामुळे व्यापलेला असतो. भ्रुणपोष सुरकुतलेला असतो. हा भ्रुणपोषच आपण सुपारी म्हणून चघळतो. चवीनुसार सुपारीचे तुरट अथवा गोड असे दोन प्रकार होतात. गोड सुपारीला मोहाची सुपारीही म्हणतात.

समुद्रकाठची उष्ण आणि दमट हवा सुपारीला चांगली मानवते. मात्र जोरदार वारा आणि कडक ऊन तिला सोसत नाही. म्हणून सुपारीच्या बागेला समुद्राच्या बाजूने दुसऱ्या झाडांचा आडोसा करावा लागतो.

लागवडीनंतर दहाव्या वर्षापासून सुपारी भरपूर पीक देते. एका झाडाला दरवर्षी दोनशे ते अडीचशे सुपाऱ्या लागतात. सुपारीचे पाडप तसे धोक्याचे शिवाय एका उंच

झाडावर चढून खाली उतरायचे आणि मग दुसऱ्या झाडावर जायची यातायात. हे टाळण्यासाठी वाकबगार माणसं एका झाडाच्या शेंड्यावरून दुसऱ्या झाडाच्या शेंड्यावर झेपावतात.

सुपारीची फळे उन्हात वाळवून सोलतात नंतर उकळून पुन्हा वाळवतात.

अरेकोटिन व टॅनिन ही सुपारीतील दोन प्रमुख द्रव्ये. विड्यातील मुख्य घटक म्हणजे सुपारी. कात, सुपारी आणि चुना यांच्या-परस्पर क्रियेतून विड्याचा लाल रंग तयार होतो.

तांबुलसेवन ही एक प्राचीन परंपरा आहे. पचन क्रियेस तांबूलसेवनाने मदत होते. अरेकोटिन चेतासंस्थेला उत्तेजित करते. अर्थात सुपारीचे अधिक सेवन घातकच असते.

पशुवैद्यकात सुपारीचा उल्लेख आणि वापरही कृमिघ्न म्हणून केला जातो.

नारळाच्या झाडाप्रमाणेच सुपारीचे इतर अनेक बरेच उपयोग आहेत. मिखेल अथवा नागवेलीला आधार म्हणून सुपारीच्या झाडाचा उपयोग होतो.

सुपारीला सांस्कृतिक महत्त्वही आहे. प्रत्येक पूजनाच्या आरंभी सुपारी पूजन गणेशपूजन म्हणून केले जाते. एखादी गोष्ट पक्की ठरल्याच निर्देशक म्हणून अखंड सुपारी देतात. मंगलदायी वाङ्निश्चयाला न फोडलेल्या सुपाऱ्याच वाटतात. कारण त्या मांगल्य, समृद्धी आणि स्नेहाचं प्रतीक आहेत.

***



# आपटा, कांचन आणि मंडळी

''सोने लुटुनी सायंकाळी मोरू परतुनि आला !
बहीण काशी आनंदाने ओवाळी मग त्याला ।।
दसरा सण मोठा! नाही आनंदा तोटा ।।''

जुन्या क्रमिक पुस्तकातील एक कविता दसऱ्याचे महत्त्व सांगते. दसरा सण पाऊसकाळ संपल्यावर येतो. वातावरण स्वच्छ, तरारलेली पिके, याबरोबरच नऊ दिवस देवीची आराधना केल्यामुळे मन प्रसन्न आहे. या आनंदाचा परमोच्च क्षण म्हणजे दसरा.

दसऱ्याचे सोने म्हणजे आपट्याची पाने. ती लुटण्यामागे एक सुंदर कथा आहे. वरतंतु मुनींचा शिष्य कौत्स त्यांना १४ कोटी सुवर्णमुद्रा गुरूदक्षिणा म्हणून देऊ इच्छित होता. एवढे मोठे धन कुठे मिळणार हा प्रश्न होताच. कौत्स मग रघुराजाकडे आला. पण नुकताच अश्वमेध यज्ञ पार पाडल्यामुळे रघुरजाचा खजिना रिकामा झाला होता. कौत्साची मागणी पुरी करण्यासाठी मग रघुराजाने कुबेरावर स्वारी करण्याचे ठरविले. ही बातमी कळताच घाबरून जाऊन कुबेराने रघूच्या खजिन्यावर रात्री सुवर्ण मोहरांचा पाऊस पाडला. त्या सर्व मोहरा रघूने कौत्साच्या स्वाधीन केल्या. १४ कोटींपेक्षा अधिक मुद्रा मला नकोत असा कौत्साचा आग्रह तर दिलेले दान परत घेणार नाही असा रघूचा निग्रह! मोहरा तर १४ कोटींपेक्षा

अधिक होत्या. अखेर एका वृक्षाखाली जास्तीच्या मोहरा ठेवल्या आणि मग प्रजाजनांनी त्या लुटल्या. त्या झाडाखाली या मुद्रा ठेवल्या होत्या ते झाड होते आपट्याचे. आताच्या काळात अशा मोहरा कुणीच झाडाखाली ठेवणार नाही. पण या सर्वांचे प्रतीक म्हणून आपण आपट्याची पाने सोन्याच्या मोहरा लुटून आणतो.

त्या वेळी आपट्याची पूजा करून त्याच स्तवन करायचं असतं!

'अश्मन्तक महावृक्ष महादोष निवारण
इष्टांनां दर्शनं देही कुरू शत्रुविनाशनम्।

अश्मन्तक म्हणजे खडक फोडणारा, खडकाळ जमिनीतूनही हा वृक्ष व्यवस्थित वाढतो. हा महान वृक्ष सर्व दोषांचे निवारण करून इष्ट कामना पुरी करतो; अशा आपट्याची पूजा करून शत्रूचा नाश करण्यासाठी त्याची ही प्रार्थना केली आहे. हल्लीच्या दिवसात आपण जंगलात जाऊन आपट्याची पाने लुटून आणीत तर नाहीच पण विकत आणतो ती कांचनाची पाने. आपटा आणि कांचन हे सख्खे भाऊ म्हणावयास हरकत नाही. दोन्हीचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे पान. हे पान जोडपान असल्यासारखेच वाटते. बॉहिन नावाच्या दोन फ्रेंच वनस्पतीतज्ज्ञांच्या स्मरणात या जुडव्या पानाच्या झाडाला बॉहिनिया असे वानसशास्त्रीय नाव दिले गेले. आपटा म्हणजे बॉहिनिया रसिमिजे, त्यांची पानं लहान असतात. फुलंही नगण्य आकारमानाची आणि त्यांची मंजिरी असते. ही फुलं पिवळट पांढुरकी असतात. हा काही शोभिवंत वृक्ष नाही. म्हणून त्याची मुद्दाम लागवड केली जात नाही. कात्रजला,



लॉ कॉलेज मागच्या टेकडीवर आपटा आढळतो.

आपटा खडकाळ जमिनीत वाढतो हे पूर्वी आलेच आहे. त्याची पाने वाळून कुजून जमिनीचा कस वाढवतात. आणि मुळे जमिनीची खूप थांबवतात. म्हणजे पर्यावरणाच्या दृष्टीने हा वृक्ष लक्ष देण्याजोगा आहे. या वृक्षाची साल पांढुरक्या रंगाची आणि तंतुमय असते. जखमेला टाके घालण्यासाठी या धाग्यांचा उपयोग करीत असल्याचा आयुर्वेदीय उल्लेख आहे. पान आणि साल ॲस्ट्रिंजंट म्हणजे स्तंभक आहेत. त्यामुळे तोंड आले असता पान आणि सालीच्या काढ्याच्या गुळण्या करतात. डोकं दुखत असताना त्यांचा लेप डोक्यावर घालतात.

आपट्याच्या पानांच्या विड्या वळतात. साहित्यसम्राट न. चिं. केळकरांनी यावर अशी टिप्पणी केली होती की हिंदुस्थानात सोन्याचा धूर निघतो ही गोष्ट खरी आहे. आदल्या दिवशीचे सोन्याचे पान दुसऱ्या दिवशी विडीसाठी !

कांचनाची पान आपट्याच्या पानांपेक्षा आकाराने मोठी असतात. फुलंही मोठ्या आकाराची ठसठशीत असतात. त्यांचे रंगही अनेक लिंबासारखी पिवळी, लालसर, जांभळ्या रंगाची आणि स्वच्छ शुभ्र धवलही आमच्या एका मैत्रिणीचा मला एका बाबतीत हेवा वाटतो. तिच्या खिडकीपासून ४ हातांवर एक हिमसेक कांचन आहे. जानेवारीच्या सरत्या दिवसांत तो इतका फुलतो की त्याचं पानही नजरेस पडत नाही. मग कल्पना येते की मिट्ट काळ्या अंधारात हे दृश्य किती रोमांचकारी असेल ?

कांचन आयुर्वेदात मान्यवर आहे. मूळव्याध या

विकारात गुग्गुळ कांचनाचा प्रयोग यशस्वी होतो.

हिमालयाच्या पायथ्याच्या वनातून हा वृक्ष वन्य स्वरूपात आढळतो. ऋतुसंहार या काव्यात विंध्यवनश्रीत कांचनाचे वर्णन करताना असं म्हटले आहे की भुंगे ज्याच्यावर मधूसेवनासाठी रुंजी घालीत आहेत असा कांचन कोणाचे मन आकर्षून घेत नाही ?

बॉहिनियाच्या आणखी एका जातीच्या जाताजाता उल्लेख करायला हवा. हा बॉहिनिया 'मावळी' याच नावाने कोकणात माहिती असतो. कारण सूर्यास्ताला याची पाने मिटतात, मावळतात. मात्र मावळीचा वृक्ष नसतो. तर वेल असते. आणखी विशेष म्हणजे याला वेल म्हणणे धाडसाचेच, कारण हा वेलीसारखा शेलाटा नाजूक नसतो; त्याचे खोड दणकट जाडजूड असते. म्हणजे महालताचं. अलिबाग जवळ कनकेश्वरच्या जंगलात याचे एवढे मोठाले झोके पाहिले आहेत की एकावेळी ३-४ प्रौढही त्यावर सहज झुलतील. मात्र या महालतेची वाढ इतकी जोमाने असते की हां हां म्हणता ती सारे जंगल व्यापून टाकते आणि म्हणूनच तिला जंगलाचा शत्रू मानण्यात येते. मावळीचे पान म्हणजे आपट्याच्या पानाची 'जम्बो एन्लार्जमेन्ट' दोन पाने जोडली की बस्स! एका मोठ्या ताटाएवढी पत्रावळ तयार !

या वेलीचे कोवळे ताण नाजूक वाटले तरी भक्कम असतात. त्यांचा आणि झाडाच्या सालीचा उपयोग दोरखंडासारखा करतात.

***